## आजचे पंचांग

दिनांक : ३ जुलै २०२६ वार : शुक्रवार माह (अमावस्यांत) : ज्येष्ठ माह (पूर्णिमांत) : आषाढ ऋतु : वर्षा आयन : दक्षिणायन पक्ष : कृष्ण पक्ष तिथी : तृतीया तिथी (सकाळी ११:२० पर्यंत) त्यानंतर चतुर्थी तिथी नक्षत्र : श्रवण नक्षत्र (सकाळी ११:४६ पर्यंत) त्यानंतर धनिष्ठा नक्षत्र योग : विष्कुम्भ योग (सायंकाळी ०४:५९ पर्यंत) त्यानंतर प्रीति योग करण : विस्ती भद्रा करण (सकाळी ११:२० पर्यंत)

दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...


## मुलाविरोधात आईला मिळाले कायदेशीर संरक्षण

**पुणे** : मुलाला चांगले शिक्षण देऊन मोठे केल्यानंतर उतारवयात तो जीवनाचा आधार बनेल, असे आई-वडिलांना वाटत असते. मात्र, काही पालक कमनशिबी ठरतात. अशीच दुर्दैवी स्थिती एका ज्येष्ठ दाम्पत्यावर ओढवली. त्यांच्या स्वप्नांचा चक्काचूर झाला. मुलगा व्यसनाच्या आहारी गेला आणि आई-वडिलांना पैशासाठी त्रास देऊ लागला. पैसे देण्यास नकार दिल्यावर शिवीगाळ, धमक्या आणि मारहाणीपर्यंत तो पोहोचला. मुलाकडून सातत्याने होणाऱ्या शारीरिक, मानसिक आणि आर्थिक छळाला कंटाळून अखेर ५३ वर्षीय आईने न्यायालयाचे दार ठोठावले. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी पी. बी. पाटील यांच्या न्यायालयानेही आईची व्यथा ग्राह्य धरत वारजे माळवाडी पोलिसांना आई-वडिलांचे मुलापासून संरक्षण करण्याचे अंतरिम आदेश दिले.


आरएनआाय : MAHMAR/2021/85884 शुक्रवार, दि. ३ जुलै २०२६ वर्ष - १ अंक - २७७ पाने - ४ पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### पुण्यात 'कॉकरोच जनता पार्टी' च्या आंदोलनाला पोलिसांनी परवानगी नाकारली; कारवाईचा दिला इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : देशभरात गाजत असलेल्या 'नीट' परीक्षा पेपर घोटाळ्याच्या निषेधार्थ पुण्यात आयोजित करण्यात आलेल्या आंदोलनाला पुणे पोलिसांनी परवानगी नाकारली आहे. 'कॉकरोच पार्टी'च्या वतीने उद्या, शुक्रवार दि. ३ जुलै २०२६ रोजी डेक्कन परिसरातील छत्रपती संभाजी महाराज पुतळ्याजवळ आंदोलन आणि निदर्शने करण्याची परवानगी मागण्यात आली होती. मात्र, पोलिसांनी सुरक्षेच्या कारणास्तव ही परवानगी नाकारली.

**कायदा व सुव्यवस्थेचे कारण देत परवानगी नाकारली**

नीट परीक्षेतील गैरव्यवहारामुळे विद्यार्थ्यांमध्ये संताप आहे. याच मुद्द्यावरून पुण्यात छत्रपती संभाजी महाराज पुतळ्याजवळ आंदोलन करणार होते. मात्र, या आंदोलनामुळे शहरात कायदा व सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकतो, तसेच वाहतुकीला अडथळा निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन पुणे पोलिसांनी या आंदोलनाला परवानगी देण्यास स्पष्ट नकार दिला आहे.

**कारवाईचा कडक इशारा**

पोलिसांनी जारी केलेल्या अधिकृत आदेशात स्पष्टपणे नमूद केले आहे की, जर आंदोलनकर्त्यांनी पोलिसांच्या आदेशाचा भंग करून आंदोलन करण्याचा प्रयत्न केला, तर त्यांच्यावर कायदेशीर आणि कडक कारवाई केली जाईल.

दुसरीकडे, पोलिसांनी परवानगी नाकारली असली तरी 'कॉकरोच पार्टी'चे कार्यकर्ते आंदोलन करण्याच्या भूमिकेवर ठाम आहेत. पोलिसांच्या या भूमिकेनंतर आता संघटनेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची एक महत्त्वाची बैठक होणार असून, या बैठकीत आंदोलनाची पुढील दिशा आणि अंतिम निर्णय घेतला जाईल, असे आंदोलनकर्त्यांकडून सांगितले जात आहे.

# माहिती अधिकारातील वादग्रस्त बदलांना स्थगिती

## मुख्यमंत्री आधी मौनात का होते? निर्णयानंतरही अनेक अनुत्तरित प्रश्न

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : राज्य माहिती अधिकार कायद्यात करण्यात आलेल्या वादग्रस्त बदलांना अखेर स्थगिती देण्यात आली असली, तरी या संपूर्ण प्रकरणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सामाजिक कार्यकर्ते अण्णा हजारे यांच्या आंदोलनाच्या इशाऱ्यानंतर सरकारने माघार घेतल्याचे चित्र दिसत असले, तरी सुरुवातीलाच हे बदल रोखण्यात सरकार अपयशी का ठरले, असा प्रश्न माहिती अधिकार कार्यकर्ते उपस्थित करत आहेत.

१२ जून रोजी राज्य माहिती आयोगामार्फत माहिती अधिकार नियमांमध्ये एकूण १२ महत्त्वाचे बदल राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आले. या बदलांमुळे माहिती मागवण्यासाठीचे शुल्क तिप्पट करण्यात आले. याशिवाय प्रथम अपीलसाठी ५० रुपये, द्वितीय अपीलसाठी १०० रुपये आणि माहितीच्या प्रतींसाठी प्रति पान शुल्क दोन रुपयांवरून पाच रुपये करण्यात आले. माहिती अधिकाराचा वापर करणाऱ्या नागरिकांमध्ये आणि विविध सामाजिक संघटनांमध्ये या निर्णयाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त झाली.

सरकारच्या या निर्णयाविरोधात ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी उपोषणाचा इशारा दिल्यानंतरच सरकार हलल्याचे दिसून आले. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्य माहिती आयोगाला पत्र लिहून अण्णा हजारे यांच्याशी सविस्तर चर्चा होईपर्यंत कोणतेही बदल लागू करू नयेत, अशी विनंती केली. त्यानंतर मुख्य माहिती आयुक्तांनी वादग्रस्त बदलांना स्थगिती देण्याचा निर्णय घेतला.

मात्र, याच ठिकाणी सरकारच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. माहिती अधिकारासारख्या संवेदनशील विषयातील नियमांमध्ये इतके व्यापक बदल करण्यापूर्वी सरकारने नागरिक, माहिती अधिकार कार्यकर्ते किंवा सामाजिक संघटनांशी कोणतीही व्यापक चर्चा का केली नाही? जर मुख्यमंत्री स्वतः आता चर्चा आवश्यक असल्याचे मान्य करत असतील, तर ही भूमिका अधिसूचना जारी होण्यापूर्वी का घेतली गेली नाही?

माहिती अधिकार कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे की, हा प्रश्न केवळ शुल्कवाढीचा नाही; तर नागरिकांच्या माहिती मिळवण्याच्या अधिकारावर आर्थिक अडथळे निर्माण करण्याचा




आहे. विशेषतः ग्रामीण भागातील आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांसाठी वाढीव शुल्क अडथळा ठरू शकते. त्यामुळे शासनाची भूमिका पारदर्शकतेला प्रोत्साहन देणारी नसून माहिती मिळवण्याची प्रक्रिया अधिक खर्चिक बनवणारी असल्याची टीका होत आहे.

सरकारकडून असा युक्तिवाद केला जात आहे की, माहिती अधिकाराचा काहीजण गैरवापर करतात आणि अनावश्यक अर्जांची संख्या वाढत असल्याने शुल्कवाढ आवश्यक होती. मात्र, गैरवापर करणाऱ्यांवर कारवाई करण्याऐवजी सर्वसामान्य नागरिकांवर आर्थिक भार टाकणे हा योग्य मार्ग आहे का, हा मूलभूत प्रश्न कायम आहे.

अण्णा हजारे यांनीही माहिती अधिकार हा लोकशाहीतील मूलभूत अधिकार असल्याचे स्पष्ट करत, त्याचे उत्पन्नाचे साधन बनवू नये, अशी भूमिका मांडली होती. गैरवापर रोखण्यासाठी स्वतंत्र उपाययोजना करता येऊ शकतात; मात्र शुल्कवाढ करून प्रामाणिक अर्जदारांनाच अडचणीत आणणे योग्य नसल्याचे त्यांनी म्हटले आहे.

दरम्यान, सरकारने बदलांना केवळ स्थगिती दिली आहे; ते कायमस्वरूपी मागे घेतलेले नाहीत. त्यामुळे हा वाद संपलेला नसून पुढील निर्णय काय होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. जर चर्चेनंतर पुन्हा हेच नियम लागू करण्याचा प्रयत्न झाला, तर आंदोलन अधिक तीव्र होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या संपूर्ण घडामोडीत एक प्रश्न मात्र अनुत्तरित राहतोसरकारने जनतेच्या तीव्र विरोधाची वाट का पाहिली? अण्णा हजारे यांच्या उपोषणाच्या इशाऱ्यानंतरच हस्तक्षेप करण्याची वेळ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर का आली? जर चर्चा आणि सहमती आवश्यक होती, तर ती अधिसूचना जारी होण्यापूर्वी का झाली नाही? या प्रश्नांची स्पष्ट उत्तरे मिळाल्याशिवाय सरकारची पारदर्शकतेबाबतची भूमिका संशयाच्या भोवऱ्यातच राहणार आहे.

# एसटीच्या उत्पन्नघटीचा फटका अधिकाऱ्यांना; ११ जण निलंबित, पण जबाबदारी फक्त कनिष्ठांवरच का?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नाशिक** : राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) नाशिक विभागात एकाचवेळी तब्बल ११ अधिकाऱ्यांना निलंबित करण्याची कारवाई करण्यात आली आहे. कामातील हलगर्जीपणा, निष्काळजीपणा आणि उत्पन्न वाढवण्यात झालेल्या अपयशाचा ठपका ठेवत ही कारवाई करण्यात आली असली, तरी या निर्णयामुळे एसटीच्या एकूणच प्रशासन आणि धोरणांवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

एसटीने अलीकडेच प्रवासी भाड्यात वाढ केली होती. भाडेवाढीनंतर महसूल वाढण्याची अपेक्षा असताना नाशिक विभागात गेल्या दोन हंगामांत उत्पन्नात लक्षणीय घट झाल्याचे समोर आले. या पार्श्वभूमीवर १० जून रोजी मुख्यालयातील दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या समितीने नाशिक विभागाचे अचानक निरीक्षण केले. तपासणीत विविध विभाग आणि आगारांमधील कामकाजात गंभीर त्रुटी आणि प्रशासकीय निष्काळजीपणा आढळल्याचा दावा करण्यात आला.

यानंतर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी उत्पन्नाला फटका बसण्यास कारणीभूत ठरणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाईचे निर्देश दिले आणि त्याअनुषंगाने ११ अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले. निलंबित अधिकाऱ्यांमध्ये तीन वर्ग-१ आणि आठ वर्ग-२ अधिकाऱ्यांचा, तसेच दोन आगार व्यवस्थापकांचा समावेश आहे.

मात्र, या कारवाईनंतर अनेक प्रश्न अनुत्तरित राहिले आहेत. उत्पन्नात घट होण्यामागे केवळ स्थानिक अधिकाऱ्यांची निष्काळजीपणाच कारणीभूत होती का, की एसटीच्या व्यापक धोरणात्मक निर्णयांचाही त्यात वाटा आहे? भाडेवाढीनंतरही प्रवासीसंख्या का वाढली नाही, खासगी वाहतुकीची वाढती स्पर्धा, बसची उपलब्धता, सेवा गुणवत्ता आणि वेळापत्रकातील त्रुटी यांचाही स्वतंत्रपणे आढावा घेण्यात आला आहे का, याबाबत अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

प्रशासकीय तज्ज्ञांच्या मते, केवळ निलंबनाची कारवाई करून व्यवस्थेतील मूळ समस्या दूर होत नाहीत. महसूल घटण्यामागील कारणांचे सर्वंकष विश्लेषण आणि दीर्घकालीन सुधारणा आवश्यक असतात. अन्यथा अशा कारवाया केवळ जबाबदारी निश्चित करण्यापुरत्याच मर्यादित राहतात.

दरम्यान, संबंधित अधिकाऱ्यांनी निलंबन आदेश स्वीकारले नाहीत, तर ते त्यांच्या पत्त्यावर टपालाद्वारे पाठविण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

ही कारवाई प्रशासनात शिस्त प्रस्थापित करण्यासाठी महत्त्वाची मानली जात असली, तरी एसटीच्या आर्थिक घसरणीची खरी कारणे शोधून त्यावर ठोस उपाययोजना होणार की केवळ अधिकाऱ्यांवर कारवाई करून प्रकरण संपवले जाणार, हा प्रश्न अद्याप कायम आहे.

## जात पडताळणीत कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर; संवेदनशील निर्णय तंत्रज्ञानावर सोपवणे कितपत योग्य?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : अनुसूचित जमातींची जात पडताळणी प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि सुलभ करण्यासाठी ब्लॉकचेन आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) वापरण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. शासनाचा उद्देश प्रक्रिया वेगवान, डिजिटल आणि विश्वासार्ह करण्याचा असला, तरी जात पडताळणीसारख्या अत्यंत संवेदनशील विषयात कृत्रिम बुद्धिमत्तेवर किती अवलंबून राहावे, याबाबत प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत.

मुख्यमंत्र्यांनी दुबार अर्ज शोधणे, कागदपत्रांची प्राथमिक छाननी आणि पडताळणी अधिक परिणामकारक करण्यासाठी एआयचा वापर करण्यावर भर दिला. तसेच ब्लॉकचेन तंत्रज्ञानाद्वारे जात वैधता प्रमाणपत्रांची सुरक्षित डिजिटल पडताळणी व्यवस्था उभारण्याच्या सूचना दिल्या.

मात्र, तज्ज्ञांचे मत आहे की जात पडताळणी ही केवळ कागदपत्र तपासण्याची प्रक्रिया नसून त्यामागे ऐतिहासिक नोंदी, वंशपरंपरा, स्थानिक सामाजिक संदर्भ आणि अनेकदा गुंतागुंतीचे पुरावे असतात. अशा परिस्थितीत कृत्रिम बुद्धिमत्ता चुकीचा निष्कर्ष काढल्यास त्याचा फटका पात्र उमेदवारांना बसू शकतो. अल्गोरिदमची चूक किंवा अपूर्ण डेटामुळे एखाद्याचे हक्क धोक्यात येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# राम मंदिर कथित देणगी अपहार प्रकरण; गंभीर पुरावे समोर येत असताना पंतप्रधान मोदींचे मौन कायम का?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**अयोध्या** : अयोध्येतील श्रीराम मंदिरातील कथित देणगी अपहार प्रकरणाच्या तपासात विशेष तपास पथकाला (एसआयटी) महत्त्वाचा पुरावा हाती लागल्याचा दावा करण्यात आला आहे. एका आरोपीच्या घरातून रामराज्य कोष असे लिहिलेली आणि डिजिटल व्यवहारांसाठी क्यूआर कोड असलेली देणगी पेटी जप्त करण्यात आली आहे. या जप्तीमुळे तपासाला नवे वळण मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात असली, तरी या संपूर्ण प्रकरणावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अद्याप कोणतीही सार्वजनिक प्रतिक्रिया न दिल्याने प्रश्न उपस्थित होत आहेत.

एसआयटीच्या माहितीनुसार, आरोपी अविनाश शुक्ला यांच्या घराच्या झडतीदरम्यान ही पेटी जप्त करण्यात आली. अधिकाऱ्यांच्या मते, या क्यूआर कोडच्या माध्यमातून कथित आर्थिक व्यवहारांचा मागोवा घेता येऊ शकतो. याशिवाय सर्व आठ आरोपींच्या घरांवर छापे टाकून कागदपत्रे, इलेक्ट्रॉनिक उपकरणे आणि अन्य साहित्यही जप्त करण्यात आले आहे. न्यायालयाने तपासासाठी अतिरिक्त १५ दिवसांची मुदतही दिली आहे.

मात्र, या तपासामुळे काही महत्त्वाचे प्रश्न निर्माण झाले आहेत. देशभरातील कोट्यवधी भाविकांच्या श्रद्धेचे केंद्र असलेल्या राम मंदिराच्या नावाशी संबंधित कथित आर्थिक गैरव्यवहाराच्या आरोपांवर केंद्र सरकार किंवा मंदिराशी संबंधित सर्वोच्च स्तरावरील नेतृत्वाकडून स्पष्ट भूमिका का मांडली जात नाही? या प्रकरणातील सत्य समोर येण्यासाठी पारदर्शक तपासाची गरज असल्याचे मत अनेक स्तरांतून व्यक्त केले जात आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राम मंदिराच्या उभारणीला ऐतिहासिक आणि राष्ट्रीय अभिमानाचा विषय म्हणून अनेकदा संबोधित केले आहे. त्यामुळे मंदिराच्या नावाशी संबंधित कोणत्याही कथित आर्थिक गैरव्यवहाराच्या आरोपांवर निष्पक्ष आणि पारदर्शक तपास व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. मात्र, आतापर्यंत त्यांच्या स्तरावरून कोणतेही अधिकृत वक्तव्य आलेले नाही.

तपास अद्याप सुरू असून कोणत्याही आरोपीचा दोष न्यायालयाने सिद्ध केलेला नाही. तरीही, श्रद्धा, पारदर्शकता आणि सार्वजनिक विश्वास यांच्याशी संबंधित इतक्या संवेदनशील प्रकरणात केंद्र सरकार आणि पंतप्रधानांचे मौन अनेक प्रश्नांना जन्म देत आहे. या प्रकरणाचा संपूर्ण तपास पूर्ण होऊन सत्य जनतेसमोर येणे, हीच आता सर्वात मोठी अपेक्षा आहे.

# जातीद्वेषी पोस्टप्रकरणी एकाला अटक; पण द्वेष पसरवणाऱ्या सोशल मीडिया खात्यांवर सरकारचा वचक नेमका कुठे?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : एका विशिष्ट समाजाबाबत तसेच त्या समाजातील महिलांविषयी आक्षेपार्ह, अश्लील आणि जातीय तेढ निर्माण करणारा मजकूर सोशल मीडियावर प्रसारित केल्याप्रकरणी ज्ञानेश्वर महादेव लांडे याला पोलिसांनी अटक केली आहे. या कारवाईचे स्वागत होत असले, तरी या निमित्ताने राज्य सरकार आणि यंत्रणांच्या भूमिकेवर अनेक गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. प्रत्येक घटनेनंतर आरोपींना अटक होते; मात्र अशा प्रकारच्या द्वेषपूर्ण पोस्ट सातत्याने सोशल मीडियावर कशा काय प्रसारित होतात आणि त्यांना वेळेत आळा घालण्यात सरकार का अपयशी ठरते, हा खरा प्रश्न आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपी ज्ञानेश्वर लांडे (रा. घाटसावळी, जि. बीड; सध्या पेरणे फाटा, पुणे) याने आपल्या इन्स्टाग्राम खात्यावर एका विशिष्ट समाजाविषयी आणि त्या समाजातील महिलांविषयी अवमानकारक व अश्लील टिप्पणी असलेला व्हिडिओ तयार करून अपलोड केला होता. हा व्हिडिओ पुढे व्हॉट्सॲप ग्रुपवर मोठ्या प्रमाणात प्रसारित झाला. फिर्यादीच्या तक्रारीनंतर पिंपळनेर पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम २९९, ३५२ तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियमातील कलम ६७ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर बीड पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने आरोपीला अटक केली.

मात्र, या कारवाईनंतरही काही मूलभूत प्रश्न अनुत्तरितच राहतात. समाजात जातीय तेढ निर्माण करणारे, महिलांबाबत अवमानकारक भाषा वापरणारे किंवा धार्मिक आणि सामाजिक भावना भडकवणारे मजकूर सोशल मीडियावर वारंवार व्हायरल होत असताना, त्यावर पूर्वीच लक्ष ठेवण्याची प्रभावी यंत्रणा नेमकी कितपत कार्यरत आहे? पोलिसांना तक्रार आल्यानंतर कारवाई होते, पण अशा पोस्ट लाखो लोकांपर्यंत पोहोचल्यानंतरच प्रशासन जागे का होते?

राज्य सरकार सातत्याने सोशल मीडियावरील अफवा, द्वेषपूर्ण प्रचार आणि समाजविघातक पोस्ट रोखण्याचा दावा करत असते. सायबर पोलिसांचे स्वतंत्र जाळे, तांत्रिक साधने आणि विशेष पथके असल्याचेही सांगितले जाते. मात्र प्रत्यक्षात अनेक वादग्रस्त पोस्ट तासन्तास किंवा अनेकदा दिवसन्दिवस ऑनलाइन राहतात. त्या मोठ्या प्रमाणावर शेअर होतात, त्यानंतर सामाजिक तणाव निर्माण होतो आणि मगच गुन्हे दाखल होतात. यामुळे प्रतिबंधात्मक यंत्रणा किती प्रभावी आहे, याबाबत प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे.

याहून महत्त्वाचा मुद्दा म्हणजे अशा प्रकरणांमध्ये कायद्याची अंमलबजावणी सर्वांसाठी समान आहे का? सामाजिक कार्यकर्ते वारंवार असा आरोप करतात की, काही प्रकरणांमध्ये तातडीने कारवाई केली जाते, तर काही प्रकरणांमध्ये तक्रारी असूनही गुन्हे दाखल करण्यास किंवा आरोपींना अटक करण्यास विलंब होतो. त्यामुळे कायद्याच्या अंमलबजावणीत सातत्य आणि निष्पक्षता आवश्यक असल्याची मागणी सातत्याने होत आहे.

तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, अशा घटनांकडे केवळ कायदा-सुव्यवस्थेच्या प्रश्न म्हणून पाहून चालणार नाही. सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर द्वेषपूर्ण मजकूर तयार करणाऱ्या आणि पसरवणाऱ्या संघटित नेटवर्कवरही लक्ष ठेवण्याची गरज आहे. तसेच नागरिकांमध्ये डिजिटल जबाबदारी, कायद्याविषयी जागरूकता आणि सामाजिक सलोखा याबाबत सातत्याने जनजागृती होणेही तितकेच आवश्यक आहे. दरम्यान, पोलिसांनी या प्रकरणात तातडीने कारवाई करत आरोपीला अटक केली असून पुढील तपास सायबर पोलिसांकडून सुरू आहे. नागरिकांनी कोणत्याही अफवा, आक्षेपार्ह व्हिडिओ किंवा समाजात तेढ निर्माण करणारा मजकूर फॉरवर्ड करू नये, असे आवाहनही पोलिसांनी केले आहे.

तथापि, प्रत्येक वेळी एखादी पोस्ट व्हायरल झाल्यानंतरच कारवाई करण्याची पद्धत पुरेशी ठरणार का? सामाजिक सलोखा बिघडवणाऱ्या पोस्ट आधीच शोधून त्यावर त्वरित कारवाई करण्यासाठी सरकारने कोणती प्रभावी यंत्रणा उभारली आहे? सायबर मॉनिटरिंगची विद्यमान व्यवस्था खरोखर सक्षम आहे का? आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, जातीय द्वेषाला राजकीय किंवा सामाजिक आश्रय मिळत नाही याची खात्री सरकार कशी करणार? या प्रश्नांची ठोस आणि पारदर्शक उत्तरे मिळाल्याशिवाय अशा घटनांनंतर होणाऱ्या अटक आणि गुन्हे नोंदविण्याच्या कारवाया या केवळ प्रतिक्रियात्मक उपाय असल्याची टीका कायम राहण्याची शक्यता आहे.

## संपादकीय

### विजयाबाई नावाचे विद्यापीठ

नाटक हा सुट्टा सुट्टा अनुभव नसतो. लाल्याच्या किंवा संभाजीराजांच्या भूमिकेत काशीनाथ घाणेकर यांनी नाटक मारून नेले हे विजयाबाईंच्या व्याख्येत बसणारे नाटक नव्हते. नाटकांतील प्रत्येक नट, प्रत्येक प्रसंग यांनी मिळून एक संपूर्ण अनुभव प्रेक्षकाला द्यायला हवा हा त्यांचा आग्रह होता. १९७० आणि ८० च्या दशकात एक बाई होत्या. त्यांचे खरे नाव इंदिरा गांधी होते. पण राजकीय वर्तुळात आणि पत्रकारितेतले लोक त्यांचा उल्लेख बोलताना बाई असा करीत. तो करताना त्यामागे कौतुक, आश्चर्य, आदर, भीती असे सर्व भाव असत. राजकारणासारख्या पुरुषी क्षेत्रामध्ये स्वतःचे वर्चस्व निर्माण करण्याच्या कर्तृत्वाला दिलेली ती एक प्रकारची दाद होती. त्याच काळात मराठी रंगभूमीवरही अशाच एक बाई हुकुमत गाजवत होत्या. त्यांच्याबद्दलच्या बाई या उल्लेखातूनही असेच कौतुक, आश्चर्य, आदर, भीती व्यक्त होत असे. या बाईंचे नाव अर्थातच विजया मेहता. दिग्दर्शनासारख्या तोवर पुरुषी मानल्या जाणाऱ्या इलाख्यात बाईंनी वयाच्या विशीतिशीतच मोठा दबदबा निर्माण केला होता. मराठी समाज स्वतःला पूर्वापार नाटकवेडा समजत आला. बाईंनी सुमारे ५० वर्षांच्या कारकीर्दीत अनेक रंगकर्मींना तर घडवलेच पण पण नाटक म्हणजे काय आणि ते कसे बघायचे असते याची एक नवी दृष्टी प्रेक्षकांना दिली. नवनव्या प्रयोगांची सवय लावली. मराठी रंगभूमीवरच्या या अद्वितीय बाईंनी मंगळवारी एक्झिट घेतली. नाटकात प्रत्येक पात्राच्या भूमिकेची लांबीरुंदी ठरलेली असते. तद्वतच माणसाच्या आयुष्याला मृत्यूची मर्यादा असते. पण मोठे कलाकार अगदी छोट्या भूमिकेतही मोठा आशय भरू शकतात. बाईंसारखे रंगकर्मी तर आयुष्याची मर्यादा ओलांडून अनेक पिढ्यांवर प्रभाव टाकणारे संचित निर्माण करीत असतात. बाईंच्या जाण्याने मराठी रंगभूमीवरच्या एका समृध्द विद्यापरंपरेची कुलगुरु आणि जणू विद्यापीठाची निर्माती काळाच्या पडद्याआड गेली आहे. एकच चांगली बाब ही आहे की, हे विद्यापीठ त्यांच्या असंख्य कलाकृतींमधून, प्रयोगांमधून आणि मुख्य म्हणजे त्यांनी घडवलेल्या कितीएक कलाकारांमधून अखंड पुढे वाहते आहे व पुढेही राहणार आहे. विक्रम गोखले, नाना पाटेकर, अशोक सराफ, सुहास जोशी, प्रतिमा कुलकर्णी, रीमा लागू, नीना कुलकर्णी यासारख्या असंख्य कलाकारांनी कृतज्ञतेने सांगावे, श्रीराम लागू, अनुपम खेर, नसिरुद्दिन शाह, शबाना आझमी, अमोल पालेकर अशांसारख्यांनी त्यांच्याविषयी अतीव आदराने बोलावे यामधूनच बाई नावाच्या विद्यापीठाची थोरवी कळते. आपले वडील आणि नंतर बाई यांच्यामुळे आपले पाय जमिनीवर राहिले असे महेश एलकुंचवार यांनी म्हटले आहे. हे सर्व कलाकार आणि त्यांच्याही पुढच्या दोन पिढ्या बाईंचे ऋण मानतात यातच सर्व काही आले. विजयाबाईंचा कलेतला प्रवास एखाद्या कादंबरीला शोभेल असा होता व खरे तर त्याच्यावरच एखादे उत्कृष्ट नाटक आणि सिनेमा निघू शकेल. त्यांचे वडील थिऑसॉफिकल सोसायटीचे सदस्य. काका वारकरी. इतके की त्यांच्या नावाने आजही भिवंडीमध्ये मठ उभा आहे व तिथे भजनकीर्तने होतात. लहानपण गिरगाव नावाच्या मराठी मध्यमवर्गाच्या पंढरीमध्ये गेले. त्यांचा जन्म १९३४ चा. त्यामुळे १९४२ ची चळवळ व पुढे मिळालेले स्वातंत्र्य यांचा संस्कार त्यांच्या शाळाकॉलेजच्या वयात त्यांच्यावर झाला. त्याच काळात त्या राष्ट्रसेवा दलात जात होत्या. स्वातंत्र्यानंतरच्या आपल्या पहिल्या पिढीमध्ये भारताचे नाव जगाच्या नकाशावर नेण्याची कशी उर्मी होती याचे वर्णन त्यांनी अनेक मुलाखतींमध्ये केले आहे. तीच उर्मी त्यांच्या कामामधून प्रकट होत राहिली. कॉलेजमध्ये केलेल्या अत्र्यांच्या नाटकांमधून त्या रंगभूमीवर आल्या. नंतर गिरगावातल्या साहित्य संघाच्या नाटकांमधून कामे करू लागल्या. झुंझारराव, संशयकल्लोळ अशा नाटकातून त्यांनी भूमिका केल्या. जुन्या रंगभूमीशी असलेला हा विलक्षण धागा पुढच्या त्यांच्या सर्व प्रवासात आपल्याला कायम दिसतो. याच काळात आरंभी त्या खोटे कुटुंबात लग्न करून गेल्या. तिथे त्यांचे आयुष्य बदलले. दुर्दैवाने त्यांच्या पतीचा मृत्यू झाल्याने काही काळ त्या सैरभैर झाल्या पण नाटक या गोष्टीनेच त्यांना सावरले. पुढे फारोख मेहता यांच्याशी दुसरे लग्न करून काही काळ इंग्लंडमध्ये गेला. पुढे मध्यमवर्गीय चौकटीतून त्यांनी वाळकेश्वरच्या उच्चभ्रू वातावरणात प्रवेश केला. पण तरीही नाटकाचे मूळ प्रेम सुटले नाही. या काळात राष्ट्रीय पातळीवर अल्काझीसारखे नाट्यगुरु आणि नंतर जर्मनीतील ब्रेख्त थिएटर या आंतरराष्ट्रीय चळवळीशी त्या जोडल्या गेल्या. पण मराठी मध्यमवर्गीय मूल्यांबद्दलची आस आणि त्यातली गुंतवणूक कायम राहिली.. बराच काळ उच्चभ्रू व आंतरराष्ट्रीय स्तरावर राहूनही बाई बोलताना अतिशय उत्तम प्रवाही मराठीतच बोलत. त्यांच्या बोलण्यात खूप क्वचित इंग्रजी शब्द येत. मराठी माती, संस्कृती, भाषा यांच्याशी नुसत्या जोडलेल्या नव्हे तर किती घट्टपणे रुजलेल्या होत्या त्याचे ते निदर्शक होते. वयाच्या अवघ्या एकविसाव्या वर्षी बाईंनी विजय तेंडुलकरांचे श्रीमंत नावाचे नाटक पहिल्यांदा दिग्दर्शित केले. ही कालची पोर आम्हाला काय शिकवणार असे त्यावेळी कोणाला वाटले नाही. किंबहुना, त्या नाटकाच्या तालमींमध्येच तेंडुलकर त्यांना बाई म्हणून हाक मारू लागले व कालांतराने मराठी नाट्यसृष्टीच्याच त्या बाई झाल्या. यातूनच पुढे रंगायन ही नाट्यचळवळ उभी राहिली. श्री. पु. भागवत, श्रीराम लागू, तेंडुलकर, अरविंद देशपांडे अशासारखे विविध क्षेत्रांमधील प्रतिभावान तरुण या चळवळीचे स्थापनकर्ते होते. पण बहुदा सुलभा देशपांडे यांनी एके ठिकाणी वर्णन केले आहे त्याप्रमाणे रंगायन नावाच्या या मधमाशांच्या पोळ्यात विजयाबाईंचा दिमाख हा राणीमाशीसारखा होता.

# पिंपरी-चिंचवड पालिकेचा पालखी दौरा: नियोजनाचा अभाव की निव्वळ 'फोटो-ओप'?

## वारकऱ्यांच्या अडचणी जैसे थेच!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने नेहमीप्रमाणे प्रसिद्धीचा घाट घातला आहे. पालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या ऑन-ग्राउंड पाहणी दौऱ्याकडे बारकाईने पाहिल्यास, प्रशासनाचा तात्पुरती मलमपट्टी करण्याचा नेहमीचाच दृष्टिकोन पुन्हा एकदा समोर आला आहे. डझनभर वरिष्ठ अधिकाऱ्यांचा मोठा फौजफाटा घेऊन निघालेल्या या दौऱ्यात प्रत्यक्ष समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्याऐवजी केवळ औपचारिकताच जास्त पाहायला मिळाली.प्रशासकीय अपयश आणि मुख्य त्रुटीमेट्रोच्या कामाचा गोंधळ आणि समन्वयाचा अभाव: चालू असलेल्या मेट्रोच्या कामामुळे पालखी मार्गावर मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी आणि अडथळे निर्माण होत असल्याचे प्रशासनाने स्वतः मान्य केले आहे. परंतु, ऐन वारीच्या तोंडावर 'तोंडी आदेश' देण्यापलीकडे पालिकेने काय केले? PCMC आणि महामेट्रो यांच्यात दीर्घकालीन नियोजनाचा व समन्वयाचा प्रचंड अभाव असल्याचेच यावरून स्पष्ट होते. याचा नाहक त्रास वारकऱ्यांना आणि स्थानिक नागरिकांना सहन करावा लागत आहे.

अधिकाऱ्यांची जत्रा, कामाचा बट्ट्याबोळ: एका साध्या पाहणी दौऱ्यासाठी ३ अतिरिक्त आयुक्त, उपआयुक्त, शहर अभियंता आणि अनेक कार्यकारी अभियंत्यांची फौज रस्त्यावर उतरवण्यात आली. एवढ्या मोठ्या संख्येने वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहूनही जर रस्त्यांवरील खड्डे आणि मेट्रोचे अडथळे वेळेत दूर होणार नसतील, तर या प्रशासकीय गर्दीचा उपयोग काय, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

हॉकर्स आणि छोट्या व्यापाऱ्यांवर टांगती तलवार: भक्तांच्या नावाखाली ''रस्त्यांवरील लहान व्यावसायिक आणि स्टॉल्सवर विशेष लक्ष ठेवण्याचे'' (म्हणजेच त्यांना हटवण्याचे) आदेश देण्यात आले आहेत. दरवर्षी येणाऱ्या या सोहळ्यासाठी पालिकेला अद्यापही हॉकर्सचे कायमस्वरूपी झोनिंग किंवा शिस्तबद्ध नियोजन करता आलेले नाही. शेवटच्या क्षणी गरिबांच्या



पोटावर पाय देऊन रस्ते मोकळे करण्याचा हा प्रशासकीय मार्ग अत्यंत अन्यायकारक आहे.

शेवटच्या क्षणी मंदिरांची धावपळ: विठ्ठलवाडी येथील विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसरात दर्शन रांग आणि मंडप व्यवस्थेची अद्यापही ''पाहणी आणि बांधकाम'' सुरू आहे. लाखांच्या संख्येने येणाऱ्या भाविकांची सुरक्षा, आपत्कालीन मार्ग आणि गर्दीचे नियंत्रण यासारख्या संवेदनशील गोष्टी ऐन वारीच्या काही दिवस आधीपर्यंत अपूर्ण असणे, हे पालिकेच्या ढिसाळ कारभाराचे लक्षण आहे.

## पेपरफुटी प्रकरणांवर काँग्रेसचा सरकारवर हल्लाबोल; न्यायालयीन चौकशीसह शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :**

पिंपरी : NEET, TETgh विविध स्पर्धा परीक्षांमधील कथित पेपरफुटीच्या घटनांवरून पिंपरी-चिंचवड शहर जिल्हा काँग्रेसने केंद्र आणि राज्य सरकारवर तीव्र टीका करत उच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली न्यायालयीन चौकशीची मागणी केली आहे. पत्रकार परिषदेत बोलताना काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी या प्रकरणांमुळे लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ झाल्याचा आरोप



केला.

काँग्रेसने पेपरफुटी प्रकरणातील सर्व दोषींना तातडीने अटक करून कठोर कारवाई करण्याची मागणी केली. तसेच या घटनांची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय आणि राज्याचे शिक्षणमंत्र्यांनी राजीनामे द्यावेत, अशीही मागणी करण्यात आली.

पदाधिकाऱ्यांनी आरोप केला की, देशात आणि राज्यात वारंवार घडणाऱ्या पेपरफुटीच्या घटनांमुळे परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत झाला असून, सरकार दोषींवर प्रभावी कारवाई करण्यात अपयशी ठरत आहे. स्पर्धा परीक्षांची पारदर्शकता आणि विश्वासार्हता धोक्यात आली असून, विद्यार्थ्यांमध्ये असंतोष वाढत असल्याचा दावा त्यांनी केला.

काँग्रेसच्या मते, या प्रकरणांची निष्पक्ष चौकशी केवळ स्वतंत्र यंत्रणेमार्फत किंवा उच्च न्यायालयाच्या देखरेखीखालीच होऊ शकते. त्यामुळे संपूर्ण रॅकेटचा पर्दाफाश करून जबाबदार व्यक्तींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली. दरम्यान, काँग्रेसने केलेल्या आरोपांवर संबंधित सरकार किंवा शिक्षण विभागाची प्रतिक्रिया अद्याप समोर आलेली नाही.

## पवना बंद जलवाहिनी प्रकल्प कालमर्यादेत पूर्ण करा; आमदार शंकर जगताप यांची विधिमंडळात मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड :** पिंपरी-चिंचवडच्या भविष्यातील जलसुरक्षेसाठी महत्त्वाच्या पवना बंद जलवाहिनी प्रकल्पासाठी विशेष निधी देऊन तो कालमर्यादेत पूर्ण करावा, अशी मागणी चिंचवडचे आमदार शंकर जगताप यांनी गुरुवारी विधिमंडळात औचित्याच्या मुद्द्याद्रे केली.

२००८ मध्ये मंजूर झालेला हा प्रकल्प गेली १५ वर्षे विविध अडचणींमुळे रखडला असून, मूळ ३९८ कोटींचा खर्च वाढून आता सुमारे १,७०० कोटींवर पोहोचला आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यास दरवर्षी सुमारे १.२९ टीएमसी पाण्याची बचत



होऊन शहराला अतिरिक्त १०० एमएलडी पाणी उपलब्ध होणार असल्याचा दावा त्यांनी केला. पिंपरी-चिंचवडकरांना हक्काचे पाणी मिळावे यासाठी प्रकल्प वेळेत पूर्ण व्हावा आणि त्यासाठी शासनाने विशेष निधी द्यावा, अशी मागणी शंकर जगताप यांनी केली.

## पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्पावर पुन्हा बैठक; आश्वासनांचा पाऊस, प्रत्यक्ष कामाला अजूनही प्रतीक्षा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड :** शहराच्या भविष्यातील पाणीसुरक्षेसाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जाणारा पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्प पुन्हा एकदा बैठका आणि आश्वासनांच्या केंद्रस्थानी आला आहे. शुक्रवार, ३ जुलै २०२६ रोजी मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथे उच्चस्तरीय बैठक आयोजित करण्यात आली असून, शहरातील सर्व प्रमुख लोकप्रतिनिधींना निमंत्रित करण्यात आले आहे.

या बैठकीत महापौर रवि लांडगे, खासदार श्रीरंग बारणे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, आमदार महेश लांडगे, शंकर जगताप, उमा खापरे, अमित गोरखे तसेच इतर पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. मात्र, नागरिकांच्या दृष्टीने महत्त्वाचा प्रश्न असा आहे की, अनेक वर्षांपासून बैठका, पाठपुरावे आणि घोषणा होत असताना प्रकल्पाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीत अपेक्षित प्रगती का झालेली नाही?

पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्पामुळे पाणीगळती, बाष्पीभवन, प्रदूषण आणि अतिक्रमण यांसारख्या समस्या कमी होण्याचा दावा केला जात असला तरी, आजही शहराला खुल्या कालव्यावरच अवलंबून राहावे लागत आहे. वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर पाणीसुरक्षेचा प्रश्न अधिक गंभीर होत असताना, प्रकल्पाची गती मात्र प्रशासकीय प्रक्रियेतच अडकलेली असल्याची टीका होत आहे. महापौरांनी आणि महायुतीतील लोकप्रतिनिधींनी सातत्याने पाठपुरावा केल्याचा दावा केला जात असला, तरी इतक्या वर्षांच्या पाठपुराव्यानंतरही प्रकल्प निर्णायक टप्प्यावर पोहोचू शकला नाही, हा प्रश्न उपस्थित केला जात आहे. मुख्यमंत्री स्तरावर वारंवार चर्चा होऊनही प्रत्यक्ष कामाची सुरुवात आणि कालबद्ध अंमलबजावणी याबाबत स्पष्ट चित्र अद्याप समोर आलेले नाही. मावळ परिसरातील शेतकरी आणि स्थानिक नागरिकांनी प्रकल्पाबाबत विविध आक्षेप आणि मागण्या सातत्याने मांडल्या आहेत. त्यांच्या चिंता दूर करण्यासाठी प्रभावी संवाद आणि विश्वासार्ह तोडगा अद्याप निघालेला नसल्याने स्थानिक विरोध कायम आहे. त्यामुळे केवळ बैठकांचे आयोजन करून प्रश्न सुटणार नाहीत, तर सर्व संबंधित पक्षांचा विश्वास संपादन करणारा व्यवहार्य मार्ग शोधण्याची गरज असल्याचे मत व्यक्त होत आहे.

उद्याच्या बैठकीत प्रशासकीय मंजुरी, निधी, विभागांमधील समन्वय आणि अंमलबजावणीचा कालबद्ध आराखडा यावर चर्चा होणार असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, नागरिकांच्या अपेक्षा आता आणखी एका बैठकीपुरत्या मर्यादित नसून, ठोस निर्णय, स्पष्ट वेळापत्रक आणि प्रत्यक्ष कामाची सुरुवात यावर आहेत.

पिंपरी-चिंचवडकरांना पाणीसुरक्षेची हमी देण्याची वेळ आता घोषणांची नसून कृतीची आहे. त्यामुळे ही बैठकही केवळ औपचारिकता ठरते की प्रत्यक्षात प्रकल्पाला गती देणारे निर्णय घेते, याकडे शहराचे लक्ष लागले आहे.

## भोसरी औद्योगिक क्षेत्रातील वीज प्रश्नावर महावितरण आणि लघुउद्योग संघटनेची महत्त्वाची बैठक

### तळवडे येथील वीजखंडितीबाबत तीव्र नाराजी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड :** भोसरी औद्योगिक परिसरात वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे उद्योजक हवालदिल झाले आहेत. या गंभीर समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी पिंपरी-चिंचवड लघुउद्योग संघटना आणि महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची एक उच्चस्तरीय बैठक मंगळवारी (३० जून) भोसरी येथील महावितरण कार्यालयात संपन्न झाली. या बैठकीत उद्योगांना अखंडित वीजपुरवठा देण्याबाबतच्या विविध उपाययोजनांवर सविस्तर मंथन करण्यात आले.अधिकारी आणि उद्योजकांमध्ये थेट चर्चाया बैठकीला पिंपरी-चिंचवड लघुउद्योग संघटनेचे अध्यक्ष संदीप बेलसरे, माजी अध्यक्ष सुरेश म्हेत्रे, सचिव जयंत कड, संचालक प्रमोद राणे, नवनाथ वायाळ, सुरेश गयस आणि निरंजन सुतार उपस्थित



होते. तर महावितरणच्या वतीने नवनियुक्त कार्यकारी अभियंता लहाने, अधीक्षक अभियंता सिंहाजी गायकवाड, आकुर्डीचे सहाय्यक अभियंता शिंके, मोशीचे सहाय्यक अभियंता मोरे, तळवडेचे उपविभागीय अभियंता सरोदे, तसेच विभागीय अभियंते झोपे आणि टुलमुळकर यांनी हजेरी लावली. बैठकीच्या सुरुवातीला संघटनेच्या वतीने नवनियुक्त अधिकाऱ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.तळवडे परिसरातील परिस्थिती चिंताजनक; 'देवी इंद्रायणी' फीडर ठरतोय डोकेदुखीबैठकीचे संचालन करताना अधीक्षक अभियंता सिंहाजी गायकवाड यांनी मागील महिन्यातील फीडरनिहाय वीजपुरवठ्याचा आढावा सादर केला. योग्य नियोजन आणि समन्वयामुळे काही भागांतील वीज पुरवठा सुधारला असल्याचा दावा त्यांनी केला. मात्र, तळवडे विभागातील वीज खंडित होण्याचे प्रमाण अजूनही चिंताजनक असल्याची कबुली त्यांनी दिली. विशेषतः तळवडे येथील 'देवी इंद्रायणी' फीडरवर वारंवार होणाऱ्या वीज पुरवठ्याच्या खोळंब्यामुळे उद्योजकांनी महावितरणच्या कारभारावर तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली.उत्पादन प्रक्रियेला फटका; उद्योजकांचे मोठे आर्थिक नुकसानलघुउद्योग संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी महावितरण प्रशासनासमोर औद्योगिक क्षेत्रातील वस्तुस्थिती मांडली. वारंवार वीज जात असल्यामुळे कंपन्यांमधील उत्पादन प्रक्रिया पूर्णपणे कोलमडली असून, कामगारांच्या नियोजनात अडचणी येत आहेत. यामुळे उद्योजकांना मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत असल्याचे सांगत, वीजपुरवठा त्वरित सुरळीत न झाल्यास उद्योग चालवणे कठीण होईल, असा इशारा उद्योजकांनी दिला आहे.

## पुण्यात ४३० कोटींच्या आरोग्य प्रकल्पाच्या निविदेवर संशयाचे सावट; स्थानिक कंपनी अपात्र, गुजरातच्या कंपनीला लाभ झाल्याचा आरोप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पुण्यातील सुमारे ४३० कोटी रुपयांच्या आरोग्य पायाभूत सुविधा प्रकल्पाच्या निविदा प्रक्रियेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. महाराष्ट्रातील एका स्थानिक कंपनीला तांत्रिक कारणांवरून अपात्र ठरवल्यानंतर गुजरातमधील कंपनीला कंत्राट मिळण्याचा मार्ग मोकळा झाल्याचा आरोप होत असून, संपूर्ण प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

स्थानिक उद्योजकांच्या मते, संबंधित कंपनी आवश्यक क्षमता आणि अनुभव असतानाही तिला तांत्रिक निकषांच्या आधारे स्पर्धेबाहेर करण्यात आले. त्यानंतर बाहेरील राज्यातील कंपनीला लाभ झाल्याने निविदा प्रक्रियेत पक्षपातीपणा झाला का, अशी चर्चा सुरू झाली आहे. या आरोपांची अधिकृत पुष्टी झालेली नसली तरी, प्रशासनाने संपूर्ण प्रक्रिया



पारदर्शकपणे स्पष्ट करण्याची मागणी जोर धरत आहे.

विरोधी पक्ष आणि काही व्यावसायिक संघटनांनी आरोप केला आहे की, स्थानिक उद्योगांना संधी देण्याऐवजी बाहेरील कॉर्पोरेट कंपन्यांना प्राधान्य दिले जात आहे. त्यामुळे राज्यातील उद्योग, रोजगार आणि स्थानिक अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम होत असल्याची टीका केली जात आहे.

या प्रकरणामुळे पुण्यातील व्यावसायिक आणि राजकीय वर्तुळात असंतोषाचे वातावरण निर्माण झाले असून, निविदा प्रक्रियेतील तांत्रिक निकष, मूल्यांकनाची पद्धत आणि निर्णयप्रक्रिया सार्वजनिक करण्याची मागणी होत आहे. एवढ्या मोठ्या सार्वजनिक निधीच्या प्रकल्पात कोणत्याही प्रकारच्या संशयाला वाव राहू नये, यासाठी स्वतंत्र चौकशी करून वस्तुस्थिती नागरिकांसमोर आणावी, अशी मागणीही पुढे येत आहे.

आता प्रशासन या आरोपांवर कोणते स्पष्टीकरण देते आणि निविदा प्रक्रिया खरोखरच निष्पक्ष व नियमबद्ध होती का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### दुकान उघडले तर जीवे मारू..! दारूचे पैसे मागितल्याचा राग; वाईन शॉप कर्मचाऱ्यावर बाटलीने हल्ला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चाकण :** चाकणमधील पुणे – नाशिक महामार्गावरील छेडा वाईन शॉपीमध्ये दारूचे पैसे मागितल्याच्या कारणावरून दोन अज्ञात व्यक्तींनी कर्मचाऱ्यांवर हल्ला करून दहशत पसरवल्याची घटना सोमवारी (दि. २९ जून) रात्री साडेनऊच्या सुमारास घडली. या प्रकरणी अजय विजय लोहार (वय ३०, रा. मेदनकरवाडी, चाकण) यांनी उत्तर चाकण पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार दोन अज्ञात व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दोन अज्ञात व्यक्ती वाईन शॉपमध्ये आले आणि त्यांनी दोन दारूच्या बाटल्या घेतल्या. मात्र, पैसे न देता ते जाऊ लागले. यावेळी कर्मचारी अक्षय गोळे यांनी पैशांची मागणी केली असता, दोघे पुन्हा दुकानात आले. त्यापैकी एकाने अक्षय गोळे यांच्या कानशिलात मारून हातातील दारूची बाटली त्यांच्या डोक्यावर फोडली. या हल्ल्यात गंभीर दुखापत झाली. दरम्यान, दुसरा आरोपी काउंटरमध्ये घुसण्याचा प्रयत्न करत असताना फिर्यादी अजय लोहार यांनी त्याला अडवले. त्यावेळी आरोपीने त्यांनाही मारहाण केली. तसेच दोघांनी शिवीगाळ करत 'वाईन शॉप कसे सुरू ठेवता ते पाहतो, दुकान उघडले तर जीवे मारून टाकू,' अशी धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. उत्तर चाकण पोलिस या प्रकरणाचा पुढील तपास करत असून, सीसीटीव्हीच्या आधारे दोन्ही अज्ञात आरोपींचा शोध सुरू आहे.

### हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रोचा पहिला टप्पा जुलै तर दुसरा टप्पा डिसेंबरपर्यंत सुरू व्हावा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो चा पहिला टप्पा जुलै महिन्यात आणि दुसरा टप्पा डिसेंबर २०२६ पर्यंत सुरु करून नागरिकांना दिलासा द्यावा. त्यासाठी प्रशासनाने युद्धपातळीवर कामे पूर्ण करावे , अशी मागणी आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनी विधानसभेत केली.

हिंजवडी ते शिवाजीनगर दरम्यान धावणारी मेट्रो सेवा १५ जुलै २०२६ पासून सुरू होईल, अशी प्रशासनाकडून आशा व्यक्त केली जात होती. पण तसे होताना दिसत नाही. या प्रकल्पासाठी गेल्या काही वर्षांत अनेक तारखा जाहीर करण्यात आल्या, मात्र प्रत्येक वेळी नवीन तारीख पुढे आली, असे आमदार शिरोळे यांनी औचित्याचा मुद्दा उपस्थित करत सांगितले.

# आषाढी पालखी सोहळ्यासाठी पिंपरी-चिंचवडमध्ये व्यापक वाहतूक बदल; शहरभर मार्गवळविण्याचे आदेश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड :** आषाढी पालखी सोहळा ७ जुलैपासून सुरू होत असून संत तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखी सोहळ्यांच्या आगमन व प्रस्थानाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड वाहतूक विभागाने शहरात मोठ्या प्रमाणावर तात्पुरते वाहतूक बदल लागू केले आहेत.

वाहतूक पोलिसांनी दिलेल्या आदेशानुसार ४ ते ९ जुलैदरम्यान आळंदी, देहू आणि निगडी परिसरातील प्रमुख मार्गांवर जड-अवजड वाहनांना बंदी घालण्यात आली असून अनेक रस्ते एकेरी मार्ग (पश-ुरू) करण्यात आले आहेत. तसेच पालखी मार्गांवर सर्वसाधारण वाहनांना प्रवेशबंदी लागू करण्यात आली आहे.

**आळंदी परिसरात कडक निर्बंध**

आळंदीतील देहूफाटा, चाकण, मोशी, मरकळ, विश्रांतवाडी आणि चहोली मार्गांवरून येणाऱ्या जड वाहनांना प्रवेशबंदी असेल. देहूफाटा-आळंदी मार्गावर ४ ते ८ जुलैदरम्यान विशेष निर्बंध लागू राहणार असून पर्यायी मार्गांनी वाहतूक वळविण्यात आली आहे.

शहरातील मध्यवर्ती भागात भाविकांची गर्दी लक्षात घेता, आळंदी शहरात सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश मर्यादित करण्यात आला आहे. अत्यावश्यक सेवा, एसटी बस आणि दिंडीतील वाहने वगळण्यात आली आहेत.

**देहू आणि देहूरोड परिसरात बदल**

देहूगाव आणि देहूरोड परिसरातही जुन्या मुंबई-पुणे महामार्गासह अनेक प्रमुख रस्त्यांवर वाहनबंदी लागू करण्यात आली आहे. भक्ती शक्ती चौक, त्रिवेणीनगर, तळवडे,



किवळे आणि डांगे चौक मार्गे वाहतूक वळविण्यात येणार आहे.

देहूगाव अंतर्गत रस्त्यांवरही पालखी मार्गादरम्यान सर्व वाहनांना प्रवेशबंदी करण्यात आली असून पार्किंगसाठी स्वतंत्र मैदानांची व्यवस्था करण्यात आली आहे.

**निगडी-चिंचवड परिसरातही मोठे बदल**

भक्ती शक्ती चौक, टिळक चौक, खंडोबा माळ, त्रिवेणीनगर, थरमॅक्स चौक आणि काचघर चौक परिसरात वाहनांची मोठ्या प्रमाणावर वळवळ (वळींशऔळेप) करण्यात आली आहे. पुण्याकडे जाणारी वाहतूक पर्यायी मार्गांनी वळविण्यात येणार आहे.

अनेक प्रमुख मार्गांवर एकेरी वाहतूक लागू करण्यात आली असून काही ठिकाणी पूर्ण प्रवेशबंदी ठेवण्यात आली आहे.

**पालखी मार्गांवर विशेष बंदोबस्त**

पालखी मार्गावर वाहतूक सुरळीत राहावी यासाठी विशेष बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. देहू ते आळंदी आणि पुढे पुण्याकडे जाणाऱ्या मार्गांवर मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्त, बॅरिकेडिंग आणि वाहतूक नियंत्रण यंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे.

**प्रशासनाचे आवाहन**

वाहतूक विभागाने नागरिकांना पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे आणि पालखी सोहळ्यादरम्यान सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. भाविकांच्या सुरक्षिततेसाठी आणि पालखी सोहळा निर्विघ्न पार पाडण्यासाठी हे बदल आवश्यक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

एकूणच, आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड शहरात वाहतूक व्यवस्थेवर मोठा ताण येणार असून प्रशासनाने व्यापक नियोजनाद्वारे परिस्थिती हाताळण्याचा प्रयत्न सुरू केला आहे.

## आळंदीत पालखी प्रस्थान सोहळ्याच्या तयारीला वेग

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळंदी :** संत ज्ञानेश्वर महाराज पालखी प्रस्थान सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर आळंदीत भाविकांच्या स्वागतासाठी प्रशासनाने तयारीला वेग दिला आहे. आळंदी नगरपरिषद, देवस्थान, पोलीस, महसूल, आरोग्य व महावितरण विभागाच्या समन्वयातून पाणी, वीज, स्वच्छता, आरोग्य सेवा, वाहतूक आणि सुरक्षा व्यवस्था अंतिम टप्प्यात आहे.




भाविकांसाठी २४ तास पाणीपुरवठा, अतिरिक्त पीएमपीएमएल व एसटी बस सेवा, वैद्यकीय पथके, रुग्णवाहिका, औषधसाठा आणि कडक पोलीस बंदोबस्ताची व्यवस्था करण्यात आली आहे.

शहरात स्वच्छता, जंतुनाशक फवारणी, एलईडी दिवे, सीसीटीव्ही कॅमेरे आणि रस्त्यांची दुरुस्तीची कामेही पूर्णत्वाकडे आहेत. ७ जुलैपर्यंत राज्यभरातील दिंड्या आळंदीत दाखल होणार असून, मंदिर परिसर आणि शहर हरिनामाच्या गजराने दुमदुमू लागले आहे.

## मंचरमध्ये मालमत्ता कर बिलांचे वाटप सुरू; १५ दिवसांत कर भरण्याचे आवाहन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** मंचर नगरपंचायतीने आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी मालमत्ता कर बिलांचे वाटप सुरू केले असून, नागरिकांनी बिल प्राप्त झाल्यानंतर १५ दिवसांच्या आत कराचा भरणा करून नगरपंचायतीस सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

नगरपंचायतीच्या माहितीनुसार, ज्या नागरिकांना मालमत्ता कराचे बिल प्राप्त झाले आहे त्यांनी विहित मुदतीत कर भरावा. अद्याप बिल न मिळालेल्या नागरिकांनी नगरपंचायत कार्यालयाशी संपर्क साधून आपले बिल प्राप्त करून त्याच कालावधीत कराचा भरणा करावा.

महाराष्ट्र नगर परिषद, नगर पंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ नुसार मालमत्ता कर प्रत्येक आर्थिक वर्षाच्या प्रारंभी म्हणजेच १ एप्रिलपासून देय होतो. तसेच, अधिनियमातील कलम १५०(३) नुसार बिल प्राप्त झाल्यानंतर १५ दिवसांच्या आत संपूर्ण कराची रक्कम भरल्यास संकलित करावर १ टक्के सवलत मिळणार आहे.

विहित मुदतीत कराचा भरणा न केल्यास कलम १५०-अ(२) नुसार थकीत रकमेवर दरमहा २ टक्के शास्ती आकारली जाईल. त्यामुळे संबंधित कररक्कम दंडासह भरणे बंधनकारक राहणार असल्याचे नगरपंचायतीने स्पष्ट केले आहे. सदर कर देयके ३१ मार्च २०२६ पर्यंतच्या वसुली नोंदींवर आधारित तयार करण्यात आली आहेत. त्यानंतर कराचा भरणा केलेल्या नागरिकांची भरलेली रक्कम संबंधित बिलात समायोजित करण्यात येणार आहे.

बिलामध्ये नाव, मालमत्तेचा तपशील, कराची रक्कम किंवा अन्य तांत्रिक अथवा मुद्रणविषयक त्रुटी आढळल्यास नागरिकांनी तात्काळ मंचर नगरपंचायतीच्या कर विभागाशी संपर्क साधून आवश्यक दुरुस्ती करून घ्यावी, असेही आवाहन करण्यात आले आहे.

मंचर शहराच्या विकासकामांसाठी मालमत्ता कर हा नगरपंचायतीच्या उत्पन्नाचा प्रमुख स्रोत असल्याने सर्व नागरिकांनी वेळेत कर भरून नगरपंचायतीस सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## दुर्गम आहुपे खोऱ्यातील विद्यार्थ्यांसाठी ऐतिहासिक दिवस; शासकीय आश्रमशाळेत ११ वी, १२ वीच्या वर्गांचे थाटात उद्घाटन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्यातील अत्यंत दुर्गम आणि आदिवासी बहुल आहुपे खोऱ्यातील विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस एक सुवर्णक्षण ठरला. आदिवासी विकास प्रकल्प, घोडेगाव अंतर्गत येणाऱ्या शासकीय आश्रमशाळा आहुपे येथे इयत्ता ११ वी आणि १२ वीच्या उच्च माध्यमिक वर्गांचे भव्य उद्घाटन जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील यांच्या हस्ते अत्यंत उत्साहात पार पडले. या ऐतिहासिक पावलामुळे स्थानिक आदिवासी विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाचा मार्ग आता कायमचा मोकळा झाला आहे.मुलींची शैक्षणिक गळती थांबण्यास होणार मदतया भागात माध्यमिक शिक्षणानंतर पुढील शिक्षणासाठी कोणतीही सोय उपलब्ध नव्हती. त्यामुळे विद्यार्थ्यांना मैलोनमैल दूरच्या गावी किंवा शहरात जावे लागत असे. आर्थिक अडचण, वाहतुकीच्या अपुऱ्या सुविधा



आणि सामाजिक कारणांमुळे अनेक गुणवंत विद्यार्थ्यांना, विशेषतः मुलींना, आपले शिक्षण अर्धवट सोडावे लागत होते. या पार्श्वभूमीवर गावातच ११ वी आणि १२ वीचे वर्ग सुरू झाल्याने आता आदिवासी मुलींना सुरक्षित आणि हक्काच्या वातावरणात शिक्षण घेता येणार आहे.नेत्यांच्या पाठपुराव्याला यशराज्याच्या उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रावहिनी पवार आणि माजी सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या विशेष प्रयत्नातून आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे या वर्गांना मंजुरी मिळाली होती. आज प्रत्यक्षात वर्गांचे उद्घाटन झाल्याने दुर्गम भागातील पालकांनी आणि विद्यार्थ्यांनी प्रशासनाचे आभार मानले आहेत. यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य अधिक सक्षम होणार असून शिक्षणाचा मुख्य प्रवाह अखंडित राहण्यास मोठा हातभार लागणार आहे.ग्रामस्थ आणि मान्यवरांची मोठी उपस्थितीआदिवासी समाजाच्या शैक्षणिक क्रांतीचा पाया रचणाऱ्या या सोहळ्याला आंबेगाव तालुक्याचे ज्येष्ठ नेते व माजी सभापती प्रकाशराव घोलप, आंबेगाव तालुका उपसभापती ज्योती पारधी आणि पंचायत समिती सदस्य निलेश टेमकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यासोबतच घोडेगाव प्रकल्पाचे सहाय्यक प्रकल्प अधिकारी संदीप पाटील, प्रविण पारधी, आहुपेच्या सरपंच शोभा असवले, शंकर लांघी, पिंपरगणेच्या सरपंच मंदा सातपुते, शाळेचे प्राचार्य, शिक्षक, मोठ्या संख्येने विद्यार्थी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

## महाराष्ट्र कृषी दिनानिमित्त न्यू इंग्लिश स्कूल लाखणगाव येथे निबंध स्पर्धा उत्साहात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** राष्ट्रीय ग्रामीण विकास केंद्र, पुणे संचलित न्यू इंग्लिश स्कूल, लाखणगाव (ता. आंबेगाव) येथे महाराष्ट्र कृषी दिन तसेच माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त बुधवारी (दि. १) विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी भविष्यातील शेती या विषयावर उत्स्फूर्तपणे निबंध लेखन करून आपल्या कल्पना मांडल्या.

या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये शेतीविषयी आदर, कृषी क्षेत्राचे महत्त्व, पर्यावरण संवर्धनाची जाणीव तसेच शेतकऱ्यांप्रती कृतज्ञतेची भावना रुजविण्याचा प्रयत्न करण्यात आला. स्पर्धेला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक अनिल देसले यांनी विद्यार्थ्यांना महाराष्ट्र कृषी दिनाच्या शुभेच्छा देताना, शेतकरी हा देशाचा कणा असून त्यांच्या अथक परिश्रमांमुळेच देशाची अन्नसुरक्षा अबाधित राहते, असे प्रतिपादन केले. या उपक्रमाचे आयोजन कल्पना राजगुरू, प्रवीण शिकारे, छाया वाघुंडे, रसिका शिंदे आदी शिक्षकांनी तसेच सेवक अक्षय किर्वे यांनी केले. यावेळी पोलिस पाटील कल्पिता चंद्रकांत बोऱ्हाडे-पाटील यांनी आवर्जून उपस्थिती लावली. त्यांनी निबंध स्पर्धेतील प्रथम तीन क्रमांक पटकावणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्याची घोषणा केली. त्यांच्या घोषणेला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

### पुणे जिल्ह्यातील धरणसाठ्यात चिंताजनक घट; टेमघर धरण पूर्णतः रिकामे

**पुणे :** मान्सूनचा अपेक्षित जोर अद्याप जाणवत नसल्याने पुणे आणि परिसरातील प्रमुख धरणांमधील पाणीसाठा कमी पातळीवर आहे. २ जुलैपर्यंत उपलब्ध आकडेवारीनुसार टेमघर धरणातील पाणीसाठा शून्य टक्क्यांवर पोहोचला असून, पवना, खडकवासला, मुळशी आणि लोणावळा धरणांतील साठाही अत्यल्प आहे. पुणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरणात केवळ १५.१ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. पानशेत धरणात १७.४ टक्के, तर वरसगाव धरणात १२.७ टक्के पाणीसाठा नोंदविण्यात आला आहे. मुळशी धरणात ९.४५ टक्के आणि लोणावळा धरणात फक्त ६.१ टक्के पाणी शिल्लक आहे. पवना धरणातील पाणीसाठा १६.१ टक्क्यांवर असून, पिंपरी-चिंचवड परिसरासाठी ही स्थिती महत्त्वाची मानली जात आहे. भामा आखेड धरणात तुलनेने सर्वाधिक म्हणजे २८.४ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. मात्र, एकूणच धरणांमधील कमी साठ्यामुळे आगामी दिवसांत पावसाची तीव्रता वाढणे आवश्यक ठरणार आहे.

# पहाडदरा, शिरदाळे, वडगावपीर व मांदळेवाडी गावे अद्यापही मोबाईल नेटवर्कपासून वंचित



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील पहाडदरा, शिरदाळे, वडगावपीर आणि मांदळेवाडी ही गावे गेल्या अनेक वर्षांपासून समाधानकारक मोबाईल नेटवर्क सुविधेपासून वंचित आहेत. या चारही गावांची भौगोलिक रचना डोंगराळ असल्याने नागरिकांना मोबाईल नेटवर्कच्या समस्येला सातत्याने सामोरे जावे लागत आहे.

या गावांमध्ये स्वतंत्र मोबाईल टॉवर उभारून दर्जेदार नेटवर्क सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी पहाडदराचे सरपंच मच्छिंद्र वाघ, शिरदाळेच्या सरपंच सुप्रिया तांबे, माजी उपसरपंच मयूर सरडे, वडगावपीरचे माजी सरपंच संजय पोखरकर, मांदळेवाडीच्या सरपंच उज्वला आदक तसेच उपसरपंच रवींद्र ढगे यांनी केली आहे.

या परिसरात मोबाईल टॉवर नसल्याने विद्यार्थ्यांच्या ऑनलाइन शिक्षणावर परिणाम होत आहे. तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, ग्रामपंचायत, महसूल विभाग आणि इतर शासकीय कार्यालयांच्या ऑनलाइन कामकाजातही मोठ्या अडचणी निर्माण होत आहेत. इंटरनेट सुविधेच्या शोधात विद्यार्थ्यांना अनेकदा गावाबाहेर जावे लागत असल्याची परिस्थिती आहे.

पहाडदरा व शिरदाळे परिसरासाठी धामणी येथे, तर वडगावपीर व मांदळेवाडी परिसरासाठी लोणी येथे मोबाईल टॉवर असला तरी त्याची रेंज या गावांपर्यंत प्रभावीपणे पोहोचत नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

सध्याचे युग डिजिटल युग म्हणून ओळखले जात असताना केंद्र सरकारच्या 'डिजिटल इंडिया'सारख्या उपक्रमांनंतरही या ग्रामीण भागात मोबाईल नेटवर्कची सुविधा अपुरी आहे. त्यामुळे विद्यार्थी, नोकरदार, शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांना विविध ऑनलाइन सेवांचा लाभ घेण्यात अडचणी येत आहेत.

शेतकऱ्यांसाठी शासनाच्या विविध योजना ऑनलाइन पद्धतीने राबविल्या जात असल्याने नेटवर्कअभावी अनेकांना त्यांचा लाभ वेळेवर घेता येत नाही. पीएम किसान सन्मान योजनेसह विविध योजनांसाठी आवश्यक असलेल्या ऑनलाइन प्रक्रियेतही शेतकऱ्यांना अडथळे निर्माण होत आहेत.

> **नेटवर्कअभावी शेतकरी शासकीय मदतीपासून वंचित**
>
> शासनाच्या बहुतांश योजना ऑनलाइन झाल्या आहेत. महसूल विभागाची ई-पीक पाहणी थेट शेतातून केली जाते. मात्र या परिसरात नेटवर्क नसल्यामुळे सातबारा उताऱ्यावर वेळेत ऑनलाइन नोंदी होत नाहीत. दुष्काळ, अतिवृष्टी किंवा गारपिटीसारख्या नैसर्गिक आपत्तीनंतरही नोंदी रखडत असल्याने अनेक शेतकरी शासकीय मदतीपासून वंचित राहतात. त्यामुळे या परिसरात लवकरात लवकर मोबाईल नेटवर्कची सुविधा

## सारांश वृत्त

### केतन अगरवालच्या हत्येमागील गूढ उलगडणार; सिया गोयलने पोलिसांना पॉलिग्राफ चाचणीला संमती दिली

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणावळा :** पुण्याच्या लोहगड किल्ल्यावर त्या दिवशी नेमकं काय घडलं? सिया गोयलने केतनला किल्ल्यावरून ४०० फूट खोल दरीत कसं ढकललं? आता या सर्व रहस्यांची उत्तरे मिळण्याची शक्यता आहे. सिया गोयलने पोलिसांना पॉलिग्राफ चाचणी घेण्याची परवानगी दिली आहे. आरोपीच्या संमतीशिवाय पॉलिग्राफ चाचणी घेतली जाऊ शकत नाही. आता गोयलने परवानगी दिल्यामुळे ही चाचणी होणार आहे.

केतन हत्या प्रकरण: 'त्या' फोनमध्ये लपलंय संपूर्ण रहस्य? सियाच्या मोबाईलचे गूढ कायम; पोलिसांचा तपास आता नव्या दिशेने

मिळालेल्या माहितीनुसार, सिया गोयलच्या वकीलांनी सांगितले आहे की, सियाने लोणावळा पोलिसांना पॉलिग्राफ चाचणी देण्यास लेखी संमती दिली आहे. या चाचणीमुळे संपूर्ण घटनेबद्दल नवीन माहिती उघड होऊ शकतात. पॉलिग्राफ चाचणीदरम्यान, आरोपीला अनेक प्रश्न विचारले जातात. या चाचणीदरम्यान, मशीन हृदयाचे ठोके, रक्तदाब, घाम आणि श्वासोच्छ्वास यांसारख्या शारीरिक बदलांची नोंद करते. यामुळे आरोपी खरे बोलत आहे की खोटे, हे ठरवण्यासाठी पोलिसांना मदत होते. आज सकाळी, पोलिसांनी सिया गोयलला ज्या ठिकाणी तिने आणि चेतनने कट रचला त्या ठिकाणी घेऊ गेले होते. पुण्यातील मार्केट यार्ड परिसरातील सिया गोयलच्या घराच्या झडतीदरम्यान, पोलिसांनी १८ जून रोजी, घटनेच्या दिवशी तिने घातलेले कपडे जप्त केले.

# इस्रोच्या बंगळुरू मुख्यालयाला बॉम्बने उडवण्याची धमकी; सुरक्षा यंत्रणांकडून संपूर्ण परिसर रिकामा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बंगळुरु :** देशाची अग्रगण्य अंतराळ संशोधन संस्था असलेल्या 'इस्रो'च्या (खडठज) बंगळुरू येथील मुख्यालयाला बॉम्बने उडवून देण्याची धमकी आल्याने गुरुवारी एकच खळबळ उडाली. एका अज्ञात व्यक्तीने ईमेलद्वारे ही धमकी दिली होती. या ईमेलनंतर तातडीने पावले उचलत प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून संपूर्ण इमारत रिकामी केली. मात्र, पोलिसांनी केलेल्या तपासात कोणतीही संशयास्पद वस्तू आढळून आली नाही.

डॉग स्क्वॉड आणि बॉम्बशोधक पथकाकडून कसून तपासणी

इस्रोच्या मुख्यालयाला धमकीचा ईमेल मिळताच सुरक्षा यंत्रणांची मोठी धावपळ उडाली. घटनेचे गांभीर्य ओळखून स्थानिक पोलीस, श्वान पथक (ृस डींरिव) आणि बॉम्बशोधक व नासधूस विरोधी पथकाने (इृड) तात्काळ इस्रो मुख्यालय गाठले. सुरक्षेचा उपाय म्हणून तात्काळ सर्व शास्त्रज्ञ आणि कर्मचाऱ्यांना इमारतीबाहेर सुरक्षितस्थळी हलवण्यात आले. त्यानंतर सुरक्षा पथकांनी संपूर्ण परिसराची कोनाकोपरा न कोनाकोपरा तपासला.

धमकीचा ईमेल ठरला 'फेक'



या संपूर्ण शोधमोहिमेबाबत माहिती देताना वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले की, धमकीचा ईमेल आल्यानंतर आम्ही कोणतीही जोखीम न पत्करता तात्काळ शोधमोहीम राबवली. मात्र, संपूर्ण तपासणीत आवारात कोणतीही संशयास्पद किंवा स्फोटक वस्तू सापडलेली नाही. त्यामुळे हा धमकीचा ईमेल खोटा असल्याचे स्पष्ट झाले असून नागरिकांनी किंवा कर्मचाऱ्यांनी घाबरून जाण्याचे कारण नाही.

पोलिसांकडून अज्ञात व्यक्तीचा शोध सुरू

दरम्यान, इस्रोसारख्या संवेदनशील संस्थेला धमकी देणारा हा ईमेल नेमका कुठून आला आणि तो कोणी पाठवला, याचा शोध आता पोलिसांनी सुरू केला आहे.

बंगळुरूमधील 'संजय नगर' पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून, सायबर पोलिसांच्या मदतीने ईमेलचा आयपी ॲड्रेस (खझ अववॲर्शी) आणि इतर तांत्रिक बाबींची पडताळणी केली जात आहे. देशपातळीवर नामांकित असलेल्या संस्थेला अशाप्रकारे लक्ष्य केल्यामुळे पोलीस या प्रकरणाचा अत्यंत गांभीर्याने तपास करत आहेत.

# वडिलांच्या अंत्यविधीला मुलगा राहणार गैरहजर; मोजतबा खामेनी यांच्या सुरक्षेबाबत भारतातील प्रतिनिधीचा मोठा खुलासा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**तेल अविव :** इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांचा अंत्यविधी येत्या दोन-तीन दिवसांत पार पडणार आहे. यासाठी भारतातून नेत्यांना हजर राहण्याची विनंती केली असताना, खामेनी यांचे पुत्र मोजतबा खामेनीच अंत्यविधीला उपस्थित राहण्याची शक्यता फार कमी आहे. सुरक्षेच्या कारणास्तव मोजतबा वडील अयातुल्ला अली खामेनी यांच्या अंत्यविधीला गैरहजर राहतील, अशी माहिती खामेनी यांचे भारतातील प्रतिनिधी, अयातुल्ला हकीम इलाही यांनी दिली आहे.

सुरक्षेच्या कारणास्तव बाहेर पडण्यास मज्जाव

अयातुल्ला हकीम इलाही यांनी नुकतेच 'इंडिया टुडे'ला एक मुलाखत दिली आहे. या मुलाखतीत बोलताना इलाही यांनी मोजतबा खामेनी वडील अयातुल्ला अली खामेनी यांच्या अंत्यविधीला उपस्थित राहू शकणार नाहीत, अशी माहिती त्यांनी दिली. इस्त्रायलबरोबर अद्याप संबंध तणावपूर्ण असल्याने इलाही यांनी सुरक्षेबाबत चिंता व्यक्त केली. मी गेल्या आठवड्यात इराणमध्ये होतो, मी तिथं मित्रांना भेटोलो ज्यांनी मोजतबा यांची भेट घेतली आहे. त्यांनी सांगितले की त्यांना बाहेर येऊन लोकांना भेटायचे आहे, पण सुरक्षेच्या कारणास्तव त्यांना बाहेर येऊ दिले जाणार नाही, असे इलाही म्हणाले.

अंत्यविधीला जगभरातून येणार लोक

मित्रांनी मला सांगितले हे खूप धोकादायक आहे आणि आपण त्यांना सुरक्षा देऊ शकत नाही, मला असं वाटतं की ते बाहेर पडणार नाहीत. असे इलाही यांनी पुढे स्पष्ट केले. अयातुल्ला अली खामेनी यांच्या अंत्यदर्शनासाठी जगभरातून हजारो नागरिक आणि दिग्गज हजेरी लावण्याची शक्यता आहे. अमेरिका आणि इस्त्रायल यांच्याशी संबंध तणावपूर्ण स्थितीत असताना अंत्यविधी पार पडत असल्याने चिंता व्यक्त केली जात आहे. अयातुल्ला यांच्या मृत्यूमुळे इराणचे मोठे नुकसान झाल्याचे इलाही इंडिया टुडेशी बोलताना म्हणाले.

अयातुल्लांचा मृत्यू इराणचे मोठे नुकसान

जगभरातून लोक अयातुल्ला अली खामेनी यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी येत आहेत आणि हे आम्ही कधी विसरणार नाही, असे इलाही म्हणाले. लोक आम्हाला धीर देण्यासाठी येत आहेत, ते आम्ही तुमच्याबरोबर आहोत हे सांगण्यासाठी येत आहेत. आम्ही तुम्हाला कधी विसरणार नाही, असे इलाही म्हणाले.

# १२५ वर्षे जुन्या गुरुद्वाराच्या पाडकामावर भारताची तीव्र नाराजी; पाकिस्तानकडे उत्तरदायित्वाची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**वॉशिंग्टन :** नवी दिल्ली: पाकिस्तानातील सुमारे १२५ वर्षे जुन्या गुरुद्वाराच्या कथित पाडकामाच्या घटनेवर भारताने तीव्र नाराजी व्यक्त करत पाकिस्तान सरकारकडे स्पष्टीकरण आणि शीख धार्मिक स्थळांच्या संरक्षणासाठी तातडीने पावले उचलण्याची मागणी केली आहे.

परराष्ट्र मंत्रालयाने या घटनेला अत्यंत वेदनादायी संबोधत पाकिस्तानमधील अल्पसंख्याक समुदायांच्या धार्मिक स्थळांच्या सुरक्षिततेबाबत पुन्हा गंभीर प्रश्न उपस्थित केले. भारताने पाकिस्तानने आपल्या आंतरराष्ट्रीय आणि घटनात्मक जबाबदाऱ्यांचे पालन करून शीखांसह सर्व अल्पसंख्याकांच्या धार्मिक स्थळांचे संरक्षण सुनिश्चित करावे, असे म्हटले आहे.



भारताच्या भूमिकेनुसार, धार्मिक वारसा आणि श्रद्धास्थळांचे संरक्षण ही कोणत्याही लोकशाही व्यवस्थेची मूलभूत जबाबदारी आहे. अशा घटना केवळ धार्मिक भावना दुखावणाऱ्या नसून, अल्पसंख्याकांच्या हक्कांबाबतच्या वचनबद्धतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण करतात, असे परराष्ट्र मंत्रालयाने नमूद केले. या घटनेनंतर भारताने पाकिस्तानमध्ये अल्पसंख्याकांच्या धार्मिक स्वातंत्र्य आणि सांस्कृतिक वारशाच्या संरक्षणाच्या मुद्द्यावर पुन्हा लक्ष वेधले आहे. भारताचा आरोप आहे की, अशा घटनांमुळे पाकिस्तानातील धार्मिक अल्पसंख्याकांच्या सुरक्षिततेबाबत सातत्याने चिंता व्यक्त करण्याची वेळ येत आहे. दरम्यान, या प्रकरणावर पाकिस्तानकडून अधिकृत भूमिका किंवा स्पष्टीकरण समोर आलेले नसल्याचे वृत्त आहे. त्यामुळे या घटनेची वस्तुस्थिती, पाडकामाची कारणे आणि संबंधित अधिकाऱ्यांची भूमिका याबाबत अधिक माहिती समोर येण्याची प्रतीक्षा आहे.

या घडामोडीमुळे भारत-पाकिस्तान संबंधांमध्ये आणखी एक संवेदनशील मुद्दा निर्माण झाला असून, धार्मिक वारशाच्या संरक्षणाचा प्रश्न पुन्हा आंतरराष्ट्रीय चर्चेत येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# मेहबुबा मुफ्तींचा तेहरान दौरा चर्चेत; खामेनेई यांच्या अंत्यसंस्कारातील उपस्थितीवरून नव्या राजकीय चर्चांना उधाण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** पीपल्स डेमोक्रॅटिक पार्टी (PDP) प्रमुख आणि जम्मू-काश्मीरच्या माजी मुख्यमंत्री मेहबुबा मुफ्ती यांनी इराणचे सर्वोच्च नेते आयातुल्ला अली खामेनेई यांच्या अंत्यसंस्कारासाठी तेहरानला रवाना होताच देशाच्या राजकीय वर्तुळात नव्या चर्चांना सुरुवात झाली आहे. धार्मिक आणि राजनैतिक स्वरूपाचा हा दौरा असला, तरी त्याचे राजकीय परिणाम आणि संदेश यावर विविध स्तरांतून चर्चा सुरू झाली आहे.



मेहबुबा मुफ्ती यांचा हा दौरा अशा वेळी होत आहे, जेव्हा पश्चिम आशियातील परिस्थिती तणावपूर्ण आहे आणि भारत आपल्या परराष्ट्र धोरणात संतुलित भूमिका घेण्याचा प्रयत्न करत आहे. अशा पार्श्वभूमीवर एका प्रमुख भारतीय विरोधी पक्षाच्या नेत्याची उपस्थिती ही केवळ वैयक्तिक किंवा धार्मिक श्रद्धांजली म्हणून पाहायची की त्यामागे व्यापक राजकीय संदेश आहे, हा प्रश्न उपस्थित केला जात आहे. पीडीपीकडून या भेटीचे स्वरूप श्रद्धांजलीपर असल्याचे सांगितले जात असले, तरी राजकीय विश्लेषकांच्या मते अशा उच्च-प्रोफाइल कार्यक्रमांतील उपस्थितीला आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत राजकारणात प्रतीकात्मक महत्त्व असते. विशेषतः परराष्ट्र धोरणाशी संबंधित संवेदनशील विषयांमध्ये अशा भेटींकडे बारकाईने पाहिले जाते.

केंद्र सरकारने या दौऱ्यावर कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया दिलेली नाही. मात्र, परराष्ट्र धोरण हा केंद्राचा विषय असताना अशा भेटींचे राजनैतिक परिणाम काय असू शकतात, यावर चर्चा सुरू आहे. भारताचे इराण, इस्त्रायल आणि पाश्चात्त्य देशांशी असलेले संबंध लक्षात घेता, अशा घडामोडींचे विविध स्तरांवर विश्लेषण केले जात आहे.

राजकीय विरोधकांकडूनही या दौऱ्यावर प्रश्न उपस्थित होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दुसरीकडे, पीडीपी समर्थकांचा दावा आहे की, हा दौरा कोणत्याही राजकीय भूमिकेपेक्षा श्रद्धांजली आणि संवादाच्या परंपरेचा भाग आहे.

एकूणच, मेहबुबा मुफ्ती यांचा तेहरान दौरा हा केवळ एका अंत्यसंस्काराला उपस्थित राहण्यापुरता मर्यादित न राहता, त्याचे राजकीय, राजनैतिक आणि प्रतीकात्मक अर्थ लावले जात आहेत. आगामी काळात या दौऱ्याविषयी केंद्र सरकार, प्रमुख राजकीय पक्ष आणि परराष्ट्र धोरण तज्ज्ञांची भूमिका काय राहते, याकडे लक्ष लागले आहे.

# टीईटी पेपरफुटी प्रकरणात आणखी तिघे जेरबंद; अटक आरोपींची संख्या ७ वर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ठाणे :** महाराष्ट्र शिक्षक पात्रता (टीईटी) पेपरफुटी प्रकरणात ठाणे पोलिसांच्या विशेष तपास पथकाने (एसआयटी) उत्तरप्रदेशातून आणखी तीनजणांना अटक केली आहे. यामुळे या प्रकरणातील अटक आरोपींची संख्या आता सातवर पोहोचली असून, फरार मुख्य सूत्रधार विजेंद्र गुप्ता आणि त्याच्या साथीदारांचा शोध सुरू आहे. या अटकसत्रामुळे पेपरफुटी मागील मोठी साखळी उघड होण्याची चिन्हे आहेत.

सोनू सिंह, मिथुन सिंह आणि कपिल दहिया अशी अटक करण्यात आलेल्या तिघांची नावे आहेत. मुंबई-नाशिक महामार्गालगतच्या भिवंडीतील डोंगराळ भागात कोनगाव पोलीस ठाण्याच्या पथकाने कारवाई करत टीईटी प्रश्नपत्रिकांच्या प्रती जप्त केल्या होत्या. याप्रकरणात राजीव शाव, आकाश कुमार आणि धीरज सिंग या तिघांना अटक करण्यात आली होती.

या पेपरफुटी प्रकरणाचे पडसाद राज्यभर उमटले. दरम्यान, याप्रकरणाच्या तपासासाठी राज्य सरकारने ठाणे गुन्हे अन्वेषण शाखेचे सह पोलीस आयुक्त पंजाबराव उगले यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष तपास पथक नेमले असून या पथकामार्फत या प्रकरणाचा तपास सुरू आहे. या प्रकरणाची व्याप्ती दिल्ली, आग्रा, बिहार आणि हरियाणापर्यंत वाढली आहे.

विजेंद्र गुप्ता हा या संपूर्ण पेपरफुटी प्रकरणाचा मुख्य सूत्रधार असल्याची बाब याप्रकरणाच्या तपासादरम्यान निष्पन्न झाली. तो आणि त्याचा साथीदार अद्याप फरार असून त्यांचा विविध राज्यांत शोध सुरू आहे. दरम्यान, विजेंद्र गुप्ता याची पत्नी सुमनकुमारी गुप्ता (३५) हिचे नावही याप्रकरणात समोर आले. ती फरार विजेंद्रच्या सतत संपर्कात असल्याचे कॉल डिटेल रेकॉर्ड (सीडीआर) आणि आर्थिक व्यवहारांच्या तपासातून उघड झाले.

# छत्रपती शिवाजी महाराज, भगतसिंग यांचा अवमान केल्याचा आरोप; अभिजीत दिपकेंनी केली सहाय्यक पोलीस आयुक्तांच्या निलंबनाची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**दिल्ली :** दिल्ली पोलिसांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि भगतसिंग यांच्यावरील पुस्तकांचा अवमान केल्याचा आरोप, कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी केला आहे. जंतर मंतर येथे सध्या सुरु असणाऱ्या आंदोलनावेळी पुस्तकांच्या स्टॉलवरील पुस्तके दिल्ली पोलिसांनी फेकून दिल्याचा आरोप दिपकेंनी केला. दिपकेंनी एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर याबाबत पोस्ट करुन सहाय्यक पोलीस आयुक्त अजय शर्मा आणि त्यांच्या टीमवर कारवाई करण्याची मागणी केली.

सहाय्यक पोलीस आयुक्त अजय शर्मा आणि त्यांच्या टीमने पुस्तकं फेकून दिली. या पुस्तकांमध्ये छत्रपती शिवाजी महाराज आणि भगतसिंग यांच्या पुस्तकांचा समावेश होता. पोलिसांनी पुस्तकांचा स्टॉल उभारला म्हणून विद्यार्थ्यांना मारहाण देखील केली, असा आरोप अभिजीत दिपके यांनी एक्स पोस्टमधून केला. छत्रपती शिवाजी महाराज आणि भगत सिंग यांचा अवमान केल्याप्रकरणी सहाय्यक पोलीस आयुक्त अजय शर्मा यांचे तात्काळ निलंबन करण्यात यावे अशी आम्ही मागणी करतो, असे दिपकेंनी पुढे पोस्टमध्ये म्हटले आहे. अभिजीत दिपकेंनी एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर शेअर केलेल्या पोस्टमध्ये 'शिवाजी कोण होता' हे पुस्तक आणि विद्यार्थ्यांना मारहाणीचे व्रण दिसणारे फोटो शेअर केले आहेत. नीट पेपरफुटीप्रकरणी गेल्या १३ दिवसांपासून अभिजीत दिपके आंदोलन करत आहेत.

# भारत–जपान संरक्षण करारावर नव्या रणनीतिक समीकरणांची छाया; मोदी–ताकाइची चर्चेत 'आर्थिक सुरक्षा'चा अजेंडा पुढे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** भारत आणि जपान यांच्यात संरक्षण सहकार्याला नवे परिमाण देणारा करार पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि जपानच्या वरिष्ठ नेतृत्वातील चर्चेदरम्यान झाल्याचे समोर आले आहे. या घडामोडीमुळे आशिया-पॅसिफिक क्षेत्रातील भू-राजकीय समीकरणे अधिक गुंतागुंतीची होत असल्याचे विश्लेषकांचे मत आहे. अधिकृत पातळीवर हा करार 'रणनीतिक भागीदारी मजबूत करण्याचा टप्पा' म्हणून सादर केला जात असला, तरी प्रत्यक्षात त्यामागे चीनचा वाढता प्रभाव, पुरवठा साखळी सुरक्षा आणि संरक्षण तंत्रज्ञानावर नियंत्रण यासारखे व्यापक घटक असल्याचे स्पष्ट दिसते.

भारत आणि जपान यांनी संरक्षण सहकार्य, तंत्रज्ञान देवाणघेवाण आणि आर्थिक सुरक्षा या क्षेत्रांमध्ये एकत्रित रोडमॅपवर सहमती दर्शवल्याचे सांगितले जात आहे. मात्र या रोडमॅपची व्याप्ती आणि अंमलबजावणीची ठोस रूपरेषा अजूनही पूर्णपणे सार्वजनिक झालेली नाही. त्यामुळे हा करार नेमका किती 'ऑपरेशनल' आहे आणि किती 'राजनैतिक संदेश' देणारा आहे, याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

मोदी आणि जपानच्या नेतृत्वातील चर्चेत 'इकॉनॉमिक सिक्युरिटी' हा शब्द पुन्हा पुन्हा अधोरेखित झाला. जागतिक पुरवठा साखळीत चीनवरील अवलंबित्व कमी करणे,



सेमीकंडक्टर, संरक्षण उत्पादन आणि महत्त्वाच्या खनिजांवरील सहकार्य वाढवणे, हे या चर्चेचे प्रमुख मुद्दे मानले जात आहेत. परंतु या सगळ्या घोषणा प्रत्यक्ष औद्योगिक पातळीवर कितपत परिणामकारक ठरतात, हा मुख्य प्रश्न आहे.

भारतासाठी जपान हा केवळ आर्थिक भागीदार नसून इंडो-पॅसिफिक क्षेत्रातील रणनीतिक संतुलनाचा महत्त्वाचा घटक मानला जातो. त्याचप्रमाणे जपानसाठी भारत हा मोठा बाजार आणि चीनला पर्याय ठरू शकणारी उदयोन्मुख शक्ती आहे. या पार्श्वभूमीवर संरक्षण करार आणि आर्थिक सुरक्षा सहकार्य हे दोन्ही देशांच्या दीर्घकालीन हितसंबंधांशी जोडले गेलेले आहेत. मात्र या सहकार्याचा वेग अनेकदा घोषणांपुरताच मर्यादित राहतो, अशी टीकाही पूर्वीपासून होत आली आहे.

या नव्या करारामुळे भारताच्या संरक्षण उत्पादन क्षेत्रात परदेशी तंत्रज्ञानाचा प्रवेश वाढण्याची शक्यता आहे. विशेषतः संयुक्त संशोधन, ड्रोन तंत्रज्ञान, नौदल क्षमता आणि सायबर सुरक्षा या क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढण्याचे संकेत दिले जात आहेत. मात्र यामुळे देशांतर्गत संरक्षण उत्पादनाला किती फायदा होईल आणि किती प्रमाणात परावलंबित्व वाढेल, हा वादाचा मुद्दा आहे.

राजकीय पातळीवर पाहिले तर या भेटीचा उपयोग भारत-जपान संबंधांना 'रणनीतिक उंची' देण्यासाठी करण्यात आला आहे. परंतु आंतरराष्ट्रीय विश्लेषकांच्या मते, हे सहकार्य जितके आर्थिक आणि सुरक्षा दृष्टीने महत्त्वाचे आहे, तितकेच ते चीनच्या प्रभावाला समतोल ठेवण्याच्या प्रयत्नांचा भाग आहे. त्यामुळे हा करार केवळ द्विपक्षीय नसून बहुपक्षीय भू-राजकीय संदेश देणारा ठरतो.

भारतातील विरोधक आणि काही तज्ज्ञांचे म्हणणे असे आहे की अशा करारांमधून दीर्घकालीन धोरणात्मक स्पष्टता दिसून येत नाही. मोठ्या घोषणा केल्या जातात, पण अंमलबजावणीचा वेग आणि पारदर्शकता याबाबत प्रश्न कायम राहतात. विशेषतः संरक्षण करारांच्या बाबतीत संसदीय चर्चा आणि सार्वजनिक माहिती मर्यादित असल्याने धोरणात्मक निर्णय प्रक्रियेवर टीका होत राहते.

दुसरीकडे, सरकार समर्थक विश्लेषक या कराराला 'इंडो-पॅसिफिक स्थैर्यासाठी आवश्यक पाऊल' म्हणून मांडत आहेत. भारताला जागतिक पुरवठा साखळीत मजबूत स्थान मिळवण्यासाठी जपानसारख्या तांत्रिकदृष्ट्या प्रगत देशांशी सहकार्य अपरिहार्य असल्याचा युक्तिवाद केला जात आहे.

एकूणच, भारत-जपान संरक्षण करार हा केवळ द्विपक्षीय सहकार्याचा विस्तार नसून, आशियातील बदलत्या शक्तिसंतुलनाचा भाग आहे. परंतु या कराराचे खरे यश हे घोषणांवर नव्हे तर प्रत्यक्ष प्रकल्प, गुंतवणूक आणि तंत्रज्ञान हस्तांतरण किती वेगाने व पारदर्शकपणे होते, यावर अवलंबून असेल.